NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## जाहीर निवेदन

वर्ग ३ व ४ संदर्भातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया ही सन २०१२ मधील तीन जाहिराती (जाहिरात दिनांक २१/०४/२०१२, ०७/०५/२०१२ व ०४/०६/२०१२) सन २०१५ मध्ये (०२/०६/२०१५) अशा चार विविध जाहिराती विद्यापीठाकडून प्रसिध्द केलेल्या आहेत. दरम्यानच्या काळात तांत्रिक कारणास्तव सदर प्रक्रिया ही स्थगित केली होती. तसेच दि.०२/०६/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीत शिपाई पदाची शैक्षणिक अर्हता ही दहावी पास व कनिष्ठ लिपीक पदाची शैक्षणिक अर्हता पदवी ही नमूद आहे. सन २०१५ मधल्या जाहिरातीत अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास सापेक्ष धरुन संगणकाव्दारे सर्व अर्जांची छाननी करुन पात्र व अपात्र उमेदवारांच्या अद्यावत यादया विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. यास्तव अशा पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा दि.२५ व २६/०६/२०१६ रोजी घेण्यात येणार असून, उमेदवाराने लेखी परीक्षेत व व्यावसायिक चाचणीत प्रत्येकी किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. (लेखी परीक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त केल्याशिवाय व्यावसायिक चाचणी देता येणार नाही.)

सन २०१२ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीत व सन २०१५ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरक्षणा संदर्भातील प्रचलित नियमास अनुसरुन आरक्षणामध्ये काही अंशी बदल झालेला आहे, याची नोंद घ्यावी.

सर्व संबंधितांना याव्दारे कळविण्यात येते की, विद्यापीठातील वर्ग ३ व ४ च्या रिक्त पदाच्या दि.२१/०४/२०१२,दि.०७/०५/२०१२,दि.०४/०६/२०१२ आणि दि.०२/०६/२०१५ च्या जाहीरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या आवेदन पत्रांचा विचार करण्यात यावा व ते उमेदवार लेखी परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून त्यांना कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता तात्पुरत्या स्वरुपात दि. १९/०४/२०१६ रोजी लेखी परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येत असल्याचे दि.०४/०४/२०१६ रोजी प्रसिध्द झालेल्या **"शिक्षकेत्तर पदाच्या भरती संदर्भातील जाहीर निवेदनाव्दारे"** विविध वर्तमान पत्रातून व विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन प्रसिध्द करण्यात आले होते. असे प्रसिध्द केले असले तरी सन २०१२ च्या जाहीरातीस अनुसरुन अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार सन २०१५ च्या जाहीरातीमधील शैक्षणिक अर्हता धारण करत आहेत असे उमेदवार लेखी परीक्षेस बसण्यास पात्र असतील, याची नोंद घ्यावी.

भरती प्रक्रिये संदर्भात कोणत्याही उमेदवारांसोबत वैयक्तिक पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यांनी सर्व यापुढील सूचना विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेत स्थळावरील Home Page मध्ये Employment Opportunities Administrative staff (Non-Teaching) या लिंकवर पहाव्यात.

सबब, सर्व संबंधितांनी वरील सूचनांची नोंद घ्यावी व वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट देवून आवश्यक त्या सूचना / माहिती घ्यावी.

सही/-
कुलसचिव

जा.क्र.: सोविसो/आस्था/२०१६/५५९३
दिनांक : १५ जून, २०१६